# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.10.2024** **वारःगुरुवार**

---

1. उद्योग आणि मानवीय कार्यातील अग्रणी रतन नवल टाटा यांचं निधन, दूरदृष्टि असलेलं एक अद्वितीय व्यक्तिमत्व हरपल्याची देशभरात भावना
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून लाओसमधील व्हिएंनटाइनच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर
3. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडन आणि इस्राईलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यान्याहू यांच्यात दूरध्वनीवरून चर्चा
4. अडतिसाव्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा उत्तराखंडमध्ये पुढच्या वर्षी 28 जानेवारी ते 14 फेब्रुवारी या काळात होणार आणि
5. टी-ट्वेंटी क्रिकेटमध्ये भारतीय महिला, पुरुष संघांचे विक्रमी फरकाने विजय.

**<u>रतनटाटा-डेस्क</u>**

भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात, उद्योगासह देशाच्या जडण-घडणीत सोज्वळ मानवीय योगदान देणारे रतन नवल टाटा यांचं काल मुंबईत निधन झालं. ते 87 वर्षांचे होते. त्यांच्या निधनाबद्दल देशभरातून हळहळ व्यक्त होत आहे. जीवनकार्य अंकित करण्यासाठी शब्दही तोकडे पडतील असं उत्तुंग व्यक्तिमत्व रतन नवल टाटा यांना लाभलं होतं, त्यांनी ते आजीवन सार्थकी लावलं.भारताच्या सर्वोच्च उद्यमी आणि कोट्यधीशांमध्ये रतन टाटा यांनी स्वतःचं अतिशय वेगळं स्थान निर्माण केलं. बहुतांश मान्यवर उद्योजकांच्या तुलनेत आपल्या संपूर्ण टाटा समूहाचं दोन दशकांहून अधिक काळ नेतृत्व करताना त्यांनी अद्वितीय दूरदृष्टी, भक्कम नैतिकता दाखवत आणि महत्वाकांक्षी जागतिक अधिग्रहण करताना अतिशय संयत प्रतिष्ठा आणि लालित्यानं परिवर्तन घडवलं. भारताच्या आर्थिक इतिहासात टाटा समूहाचा वारसा लक्षणीय तर आहेच, त्यातील रतन टाटा यांची ऐतिहासिक भूमिका निःसंशय अधोरेखित राहील.

स्थापत्यशास्त्रामध्ये पदवीप्राप्त रतन टाटा 1962 मध्ये टाटा समूहात कार्यरत झाले. 1981 मध्ये टाटा उद्योगाचे ते अध्यक्ष झाले. 1991 ते 2012 पर्यंत टाटा सन्सचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी समूहाचा महसूल अब्जावधींवर नेला. जनसामान्यांची कार टाटा नॅनोच्या आविष्कारासह प्रवासी वाहन विभागात टाटा मोटर्स त्यांनी पुढे आणली. चहा, शीतपेयं, दूरसंचार, दागिने, एयर इंडिया, एक ना अनेक क्षेत्रांमध्ये टाटा उद्योग त्यांच्या भविष्यवेधी नजरेतून विस्तारला. आम्ही पोलाद देखील निर्माण करतो असं नम्रपणे सांगणाऱ्या टाटा परिवाराप्रमाणे समाजासाठीचं आपलं देणं ते सातत्यानं देत राहिले, शिक्षणापासून आरोग्यापर्यंत लक्षावधी लोकांच्या जीवनाला स्पर्श करुन त्यांनी अनेक गावांमध्ये परिवर्तन घडवून आणलं. अनेक पुरस्कारांच्या पलिकडले पुरस्कार रतन नवल टाटा यांनी आपल्या आजीवन कार्यातून मिळवले, अजरामर केले.

रतन नवल टाटा यांच्या पार्थिव देहावर आज संपूर्ण शासकीय इतमामानं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. आज महाराष्ट्रात एक दिवसाचा दुखवटा पाळण्यात येईल अशी घोषणाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

**<u>टाटा शोकसंदेश</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टाटा यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. रतन टाटा यांनी टाटां समूहाचा वारसा पुढे नेला, तो जागतिक पातळीवर नेला आणि अनेक उद्योजकांसह तरुण विद्यार्थ्यांनाही प्रेरणा दिली, असं राष्ट्रपतींनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. टाटा यांनी आत्मनिर्भर भारतासाठी दिलेलं

योगदान भारतासह जगभरातल्या उद्योजकांसाठी कायम प्रेरणादायी राहील अशा शब्दांत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी श्रद्धांजली वाहिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही समाजमाध्यमांवर श्रद्धांजली वाहिली आहे. टाटा यांना भव्य स्वप्नं बघायची सवय होती आणि समाजासाठीचं देणं फेडण्यासाठीही ते सतत कार्यरत असायचे असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. शिक्षण, आरोग्य, सांडपाणी व्यवस्थापन आणि पशुकल्याण या क्षेत्रांमध्ये रतन टाटा अग्रेसर राहिले असं पंतप्रधानांनी आपल्या शोक संदेशात नमूद केलं आहे.

**<u>मोदी दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून लाओसमधील व्हिएंनटाइनच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. परराष्ट्र व्यवहार कार्यालयातील सचिव जयदीप मझुमदार यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पंतप्रधान मोदी एकविसाव्या आसियान-भारत शिखर परिषदेत आणि एकोणिसाव्या पूर्व आशिया शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान दहाव्यांदा आसियान-भारत शिखर परिषदेत उपस्थित राहत असल्याचं मझुमदार यांनी सांगितलं. पूर्व प्रथम या धोरणाची दशकपूर्ती होत असताना ही परिषद महत्त्वपूर्ण असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. भारत-प्रशांत महासागर क्षेत्रातील शांतता, स्थिरता आणि समृद्धी यांच्यावर परिषदेत विचार केला जाईल, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<u>बायडन चर्चा</u>**

अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडन यांनी इस्राईलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यान्याहू यांच्याशी काल रात्री दूरध्वनीवरून चर्चा केली. सुमारे अर्ध्या तासाची ही चर्चा थेट आणि महत्त्वपूर्ण होती असं व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्यानं म्हटलं आहे. लेबनानमधील विशेषतः बैरुतमधील सर्वसामान्य नागरिकांना कमीत कमी हानी पोचेल अशी दक्षता घेण्याची सूचना बायडन यांनी केली. हल्ल्यांमध्ये सर्वसामान्य नागरिकांच्या जीवितहानीबद्दल बायडन यांनी चिंता व्यक्त केली.

**<u>ट्रंप कौतुक</u>**

अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं कौतुक केलं आहे. मोदी उत्तम माणूस आहेत आणि आपले मित्र आहेत असं ट्रम्प यांनी फ्लॅग्रंट पॉडकास्ट या कार्यक्रमात म्हटलं आहे. मोदी यांनी 2019 मध्ये ह्युस्टनला दिलेल्या भेटीतील हाऊडी मोदी या कार्यक्रमाला आपण उपस्थित होतो अशी आठवणही ट्रम्प यांनी सांगितली.

**<u>लष्कर परिषद</u>**

लष्करातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दुसऱ्या परिषदेचा पहिला टप्पा आजपासून सिक्कीममधील गंगटोक इथं सुरू होत आहे. संरक्षणमंत्री राजनाथसिंह या परिषदेला संबोधित करणार आहेत. प्रत्यक्ष तयारीचा आढावा, विविध धोरणांबाबत चर्चा आणि भविष्यातील कार्यवाही ठरवणं यांच्यासाठी ही परिषद आयोजित केली जाते.

**<u>मलाबार सराव</u>**

मलाबार 2024 या नौदलाच्या सरावाचा उद्घाटन समारंभ काल विशाखापट्टणम इथल्या सातपुरा या जहाजावर पार पडला. नौदलाच्या पूर्व विभागानं हा समारंभ आयोजित केला होता. अनेक देशांचा सहभाग असलेल्या या सरावाची सांगता 18 ऑक्टोबरला होणार आहे. ऑस्ट्रेलिया, जपान आणि अमेरिकेच्या नौदलांनी उद्घाटन समारंभात भारताच्या नौदलाला साथ दिली.

**<u>उमंग ऍप</u>**

उमंग ऍप आणि डिजिलॉकर सुविधा यांच्या एकत्रीकरणाची घोषणा राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स विभागानं केली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना एकाच प्रणालीमधून विविध सरकारी सेवा सहजपणे मिळू शकणार आहेत. उमंग ऍप सर्व अँड्रॉइड मोबाईल दूरध्वनीधारकांसाठी उपलब्ध आहे आणि त्याच्या सेवांचा वापर डिजिलॉकर ऍपच्या माध्यमातून करता येईल, असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>फोर्टिफाईड तांदूळ</u>**

पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत कृत्रिमरीत्या पोषणमूल्यांनी युक्त अर्थात फोर्टिफाईड तांदळाचा मोफत पुरवठा डिसेंबर 2028पर्यंत सुरू ठेवण्यास केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. रक्ताल्पता आणि सूक्ष्म पोषक घटकांच्या कमतरतेची समस्या कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. फोर्टिफाईड तांदळाचा पुरवठा करण्याच्या या योजनेच्या अंमलबजावणीसाठी 17 हजार 82 कोटी रुपयांच्यावर खर्च अपेक्षित आहे.

**<u>बॅडमिंटन</u>**

बॅडमिंटनमध्ये भारताच्या किरण जॉर्ज यानं आर्क्टिक खुल्या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीच्या आधीच्या फेरीत प्रवेश केला आहे. त्यानं तैवानच्या वांक झु वेईचा 23-21 असा सरळ सेट्समध्ये पराभव केला. भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेननंही आगेकूच सुरू ठेवली आहे. आज त्याचा सामना तैपेईच्या चौऊ तिएन चेन याच्याशी होणार आहे. महिलांमध्येही भारताच्या मालविका बनसोड, उन्नती हुडा आणि आकर्षी कश्यप यांनी सोळाव्या फेरीपर्यंत धडक मारली आहे.

**<u>राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा</u>**

अडतिसाव्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा उत्तराखंडमध्ये पुढच्या वर्षी 28 जानेवारी ते 14 फेब्रुवारी या काळात आयोजित करण्यात आल्या आहेत. भारतीय ऑलिंपिक संघटनेची बैठक येत्या पंचवीस तारखेला होणार आहे. त्यात या स्पर्धेचं संपूर्ण वेळापत्रक जाहीर केलं जाणार आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी नुकतीच भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या अध्यक्षा पी. टी. उषा यांची भेट घेतली होती आणि उत्तराखंड राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी पूर्णपणे तयार असल्याचं म्हटलं होतं.

**<u>क्रिकेट</u>**

महिलांच्या टी-ट्वेंटी विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत भारतानं श्रीलंकेवर काल दुबई इथं 82 धावांनी विजय मिळवून एक विक्रम केला. त्यामुळं अ गटात भारत क्रमवारी आणि धावसंख्येच्या प्रमाणात वरचढ ठरला आहे. हरमनप्रीत कौर आणि स्मृती मन्धना यांच्या अर्धशतकांच्या बळावर भारतानं केलेल्या 172 धावांचा पाठलाग करताना श्रीलंका संघ विसाव्या षटकात सर्वबाद 90 धावा करु शकला.

इकडे पुरुषांच्या टी-ट्वेंटी क्रिकेटमध्ये बांग्लादेशविरुद्ध दिल्ली इथं दुसरा सामना भारतानं 86 धावांनी जिंकून तीन सामन्यांच्या मालिकेत विजयी आघाडी घेतली. भारतानं दिलेलं 222 धावांचं उद्दिष्ट गाठताना पाहुणा संघ वीस षटकांत 9 बाद 135 धावा करु शकला. उभय संघांचा तिसरा सामना शनिवारी हैदराबाद इथं होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.